दैनिक तरुण भारत दि. २२-२-९५

# कोल्हापुरात डॉ. व्ही. टी. पाटील फाऊंडेशनचा १ मार्चला शुभारंभ

कोल्हांपूर, दि. २१ (प्रतिनिधी) - येथील दिवंगत शिक्षणमहर्षि आणि मौनी विद्यापीठ, ताराराणी विद्यापीठ व बिद्री साखर कारखान्याचे शिल्पकार डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या स्मृत्यर्थ स्थापन करण्यात आलेल्या डॉ. व्ही. टी. पाटील फाऊंडेशनचा शुभारंभ १ मार्च रोजी येथे समारंभपूर्वक करण्यात येणार आहे.

स्वावलंबनाच्या प्रतिष्ठेसाठी प्रयत्न, चर्चा परिसंवादासाठी प्रबोधनाचे खुले व्यासपीठ, सांस्कृतिक उपक्रमात भागिदारी, अयमशीलतेच्या वाटा प्रकाशात आणणे, विधायक सहभागाचे स्वागत, चांगल्या कामात समन्वय आणि सद्भाव सहकार्य जोपासना ही उद्दिष्टे समोर ठेवून फाऊंडेशनचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार माधव गडकरी यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी प्रतापसिंह जाधव हे असतील. या फाऊंडेशनचे विश्वस्त म्हणून सर्वश्री अनंत दीक्षित, गोविंद गं. जोशी, प्रा. डॉ. अनिलराज जगदाळे, बबन आर्दाळकर आणि कांचन परुळेकर हे कार्यरत आहेत.